कि. फौ. अर्ज क्र. ०१/२०१८
सविता+१ वि. कुशब+४

**नि. ५ खालील पारित आदेश**
(पारित दिनांक १६/०४/२०१८)

१- अर्ज व त्यावरील खुलासा वाचला. दोन्ही पक्षाचे म्हणणे ऐकले.

२- अर्जात कौटूंबिक हिंसाचाराचे आरोप करण्यात आले आहे. परंतु खुलास्यात ते नाकारण्यात आले आहे. याची शहानिशा पुराव्याच्या विश्लेषणानंतरच होईल. मान्य असलेले तथ्यकथन असे दिसुन येत आहे की अर्जदार नं. १ ही गैरअर्जदार नं. १ ची पत्नी होय. अर्जदार नं. २ त्यांचा मुलगा आहे. पती पत्नी सोबत राहत नाहीत. त्यामुळे पत्नीला व मुलाला अर्जाचा निकाल लागेपर्यंत अंतरीम पोटगी मंजुर करणे न्यायोचित होईल. करीता खालील आदेश पारित करण्यात येतो.

**आदेश**

गैरअर्जदार नं. १ ने अर्जदार नं. १ व २ यांना प्रत्येकी रू. १५००/- अंतरीम पोटगी अर्ज तारखेपासून प्रकरणाचा अंतीम निकाल लागेपर्यंत द्यावी.

दिनांक- १६/०४/२०१७

(आनंद बोरकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, पालम.